

# इतिहास लेख-4

**राहुल परब, शाळा :** महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पू)

विद्यार्थी मित्रमैत्रिणींनो

या लेखात क्रांतियुगातील औद्योगिक क्रांतीचा विचार करूया. औद्योगिक क्रांती हा मुख्यत: उत्पादन पद्धतीतील बदल होता. त्यामुळे जीवनाच्या विविध क्षेत्रांत मूलभूत बदलांना चालना मिळाली. जुन्या अवजारांची जागा नव्या गुंतागुंतीच्या यंत्रसामुग्रीने घेतली. यंत्रयुगाची सुरुवात झाली. मानव, प्राणी व जल शक्ती यांची जागा बाष्प शक्ती व पुढे विद्युत शक्तीने घेतली. लहान उद्योगांच्या जागी अवाढव्य कारखाने आले. संथपणे विकसित झालेल्या या प्रक्रियेचे परिणाम क्रांतिकारी होते. याचे वर्णन 'औद्योगिक क्रांती' म्हणून केले जाते.

**★ औद्योगिक भांडवलशाही-**

● अठराव्या शतकात युरोपीय देशात व्यापारी वर्गाचे महत्त्व वाढून व्यापारासाठी नव्या दिशा व बाजारपेठा खुल्या झाल्या.

● बाजारपेठांना आवश्यक माल पुरविण्यासाठी उत्पादनात वाढ करणे व त्यासाठी उत्पादन तंत्रात बदल होणे आवश्यक होते. यासाठी प्रचंड भांडवलाची आवश्यकता होती.

● या सर्व परिस्थितीजन्य गरजांमधून नव्याने उदयाला आलेल्या उत्पादन पद्धती, समाजरचना व जीवनपद्धती व जीवनपद्धती व नव्या विचारप्रणालीला औद्योगिक भांडवलशाही असे म्हणतात.

**★ युरोपीय देशातील धनसंचय वाढीस का लागला ?**

● पंधराव्या शतकात नव्या सागरी मार्गांच्या शोधामुळे व्यापाराचे नवे पर्व सुरू झाले.

● पूर्वेकडील देशांशी व्यापार करण्यास अनेक व्यापारी एकत्र आले व यातून भागभांडवल असणाऱ्या विविध व्यापारी कंपन्यांचा युरोपात उदय झाला.

● या कंपन्यांच्या व्यापारामुळे युरोपातील देशांची आर्थिक भरभराट झाली.

● व्यापारी कंपन्यांच्या व्यापारामुळे युरोपीय देशात विशेषत: इंग्लंडमध्ये धनसंचय वाढीस लागला. यातून युरोपात भांडवलशाही अर्थव्यवस्थेची पायाभरणी झाली.

**★ इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीच्या सुरुवातीमागील कारणे-**

औद्योगिक क्रांतीची सुरुवात प्रथम इंग्लंडमध्ये झाली. यासाठी पुढील घटक कारणीभूत ठरतात-

**★ इंग्लंडचा सत्ताविस्तार-**

● अठराव्या शतकात युरोपातील प्रमुख नाविक राष्ट्र असणाऱ्या इंग्लंडचे व्यापारी आशिया खंडात दूरवर पोहोचले होते.

● भारतातील सत्तास्पर्धेत फ्रेंचांचा पराभव केल्याने इंग्रज सत्ता भारतातील एक राजकीय सत्ता बनली होती.

● ईस्ट इंडिया कंपनीस फ्रेंच स्पर्धेचा व हस्तक्षेपाचा धोका राहिला नव्हता.

● इंग्लंडच्या या सत्ताविस्तारामुळे इंग्लंडची औद्योगिक भरभराट झाली.

**★ नव्या औद्योगिक तंत्रज्ञानाची सुरुवात-**

● इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात सुरू झालेल्या वैज्ञानिक प्रगतीमुळे व नव्या शास्त्रीय ज्ञानामुळे नवे तांत्रिक शोध लागले.

● नव्या तंत्रज्ञानाचा उपयोग इंग्लंडमध्ये व्यापारी मालाच्या उत्पादनवाढीस होऊ लागला.

● या प्रयत्नांना इंग्लंडमधील प्रशासकांनी आणि धनाढ्य व्यापारी वर्गाने प्रोत्साहन दिल्यामुळे तेथे नव्या औद्योगिक तंत्रज्ञानाची सुरुवात झाली.

**★ नैसर्गिक अनुकूलता-**

● औद्योगिकीकरणास आवश्यक नैसर्गिक अनुकूलता इंग्लंडमध्ये होती.

● यंत्रे व कारखाने उभारणीसाठी लागणारी खनिजे व दगडी कोळसा इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात असल्याने त्याचा शास्त्रीय पद्धतीने वापर करून नवी यंत्रसामग्री तयार करण्यात इंग्लंड अग्रेसर ठरले.

● इंग्लंडमधील हवामान हे वस्त्रोद्योगाला अनुकूल असल्याने तसेच अमेरिकेतील वसाहतींमधून होणाऱ्या लांब धाग्याच्या कापसाच्या पुरवठ्यामुळे इंग्लंडमध्ये वस्त्रोद्योग हा प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळे औद्योगिक क्रांतीची सुरुवात कापड व्यवसायापासून झाली.

**★ औद्योगिक क्रांतीचा प्रसार-**

● औद्योगिक क्रांतीची सुरुवात इंग्लंडमध्ये झाली. अल्पावधीत ती युरोपमध्ये पसरली.

● फ्रान्स व जर्मनीने लोखंड, पोलाद, रासायनिक उद्योगांच्या क्षेत्रात प्रगती केली.

● हॉलंड, बेल्जियम या राष्ट्रांत औद्योगिकीकरणाचा वेग चांगलाच वाढला.

● युरोपबाहेर थोड्याच कालावधीत अमेरिका उद्योगप्रधान अर्थव्यवस्था म्हणून उदयास आली.

● आशिया खंडातील जपानने उद्योगांच्या क्षेत्रात अल्पावधीत आश्चर्यकारक प्रगती केली.

**★ औद्योगिक क्रांतीचे परिणाम-**

युरोपमध्ये सुरू झालेल्या औद्योगिक क्रांतीचे जगावर दूरगामी परिणाम झाले.

**★ युरोपच्या आर्थिक प्रगतीस वेग-**

● औद्योगिक क्रांतीमुळे विविध प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले.

● देशान्तर्गत आणि आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ झाली.

● वाहतूक आणि दळणवळणाच्या साधनांमध्ये प्रगती झाली.

● औद्योगिक क्रांतीमुळे युरोपच्या आर्थिक प्रगतीस वेग आला.

**★ सामान्य जनतेचे राहणीमान सुधारण्यास मदत-**

● कारखानदारीमुळे उत्पादन वाढ झाली. वस्तूंचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढल्याने त्या स्वस्त होऊ लागल्या.

● रोजगारात वाढ झाल्यामुळे सामान्य जनतेची क्रयशक्ती वाढली.

● विविध वस्तू व स्वस्त भावामुळे सर्वसामान्य जनतेचे राहणीमान सुधारण्यास मदत झाली.

**★ लोकशाही अर्थव्यवस्थेला बळकटी-**

● औद्योगिक क्रांतीमुळे शहरांची वाढ झाली.

● सुशिक्षित नागरी लोकसंख्येत वाढ झाल्याने नागरिकांना हक्कांची जाणीव होऊ लागली.

● इंग्लंड, फ्रान्स यांसारख्या देशांमध्ये लोकशाही व्यवस्थेला बळकटी प्राप्त झाली.

**★ गरीब व श्रीमंत राष्ट्रातील विषमतेत वाढ-**

● नव्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांची गरज भासल्याने युरोपीय राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडात साम्राज्यविस्तार करण्यास सुरुवात केली.

● युरोपीय साम्राज्यवादामुळे अविकसित राष्ट्रांचे स्वातंत्र्य नष्ट झाले. ती साम्राज्यवादी राष्ट्रांना कच्चामाल पुरविणारी केंद्रे व पक्क्या मालाची हुकमी बाजारपेठ बनली.

● यातून श्रीमंत आणि गरीब राष्ट्रे यांच्यात विषमता वाढीस लागली.

**★ युरोपात घटनात्मक व कल्याणकारी राज्याची कल्पना दृढ-**

● आर्थिक, सामाजिक व राजकीय विषमतेमुळे औद्योगिक राष्ट्रांत विविध चळवळी सुरू झाल्या.

● युरोपीय राष्ट्रात कामगार, चार्टिस्ट, समान हक्कांसाठी स्त्रियांच्या चळवळी सुरू झाल्या.

● परिणामत: युरोपमध्ये घटनात्मक व कल्याणकारी राज्याची कल्पना दृढ झाली.

**★ कला व सांस्कृतिक जीवनावर परिणाम-**

● कला आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये सामान्य माणसाच्या जीवनाचे पडसाद उमटले.

● चित्रकलेतही सामान्य माणसाचे जीवन वास्तवतेने चितारले जाऊ लागले.

● लघुकथा, कादंबरीसारख्या नव्या वाङ्मयप्रकारांमुळे वाङ्मय अधिक समृद्ध झाले.

● विसाव्या शतकातील तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे चित्रपट कलेचा विकास झाला.

**★ नागरी समस्यांमध्ये वाढ-**

● औद्योगिक क्रांतीमुळे उदयास आलेल्या नव्या शहरात विविध नागरी समस्या निर्माण झाल्या.

● खेड्यातून शहराकडे स्थलांतर झाल्यामुळे शहरी लोकसंख्या वाढली, त्यातून जागांची टंचाई, अपुरा पाणीपुरवठा, अपुऱ्या सोयी असे अनेक प्रश्न निर्माण झाले.

● अनारोग्य, गलिच्छ वस्त्या, प्रदूषण यामुळे परिस्थिती अधिक गंभीर बनली.

**★ समाजवादी तत्त्वज्ञानाचा विकास-**

● औद्योगिकीकरणामुळे बेकारी, अल्पमजुरी, सुरक्षा व्यवस्थेचा अभाव यासारखे प्रश्न गंभीर बनले.

● श्रमिकांच्या हितसंबंधरक्षणासाठी 'कामगार संघटना' स्थापन होऊ लागल्याने उद्योगपती व कामगार यांच्यातील संघर्ष वाढीस लागला. यातून समाजवादी तत्त्वज्ञानाचा विकास झाला.

**★ मानवी मूल्यांमध्ये बदल-**

● एकत्र कुटुंबपद्धतीचा ऱ्हास झाला.

● परंपरावाद, अंधश्रद्धा यांचा प्रभाव कमी होऊन बुद्धिप्रामाण्यवादाचा प्रसार झाला.

● पैसा हे मानवी यशाचे मोजमाप बनले व जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भोगवादी बनला.

● मानवी जीवनात यांत्रिकपणा आणि एकसुरीपणा येऊ लागला.

एकंदरीत जगाच्या इतिहासावर औद्योगिक क्रांतीचे चांगले-वाईट असे दुहेरी व दूरगामी परिणाम झाले.

**उद्याचा विषय : भूगोल**

लोकसत्ता यशस्वी भव! दहावी अभ्यास मालिका

संपर्क : yashasvibhava2007@gmail.com




यंदाच्या पावसाळ्यात तुमच्या मुलाला

**असुरक्षित** ठेवू नका.

पावसाळ्यामध्ये पाण्यावाटे फैलावणाऱ्या आजारांची जोखीम खूपच वाढते.
ॲक्वागार्ड टोटल द्वारा तुमच्या कुटुंबीयांना जॉंडिस, टायफॉइड
आणि डायरिया सारख्या आजारांपासून संपूर्ण सुरक्षा
मिळत असल्याची खात्री करून घ्या. म्हणूनच 40 लाख माता
केवळ ॲक्वागार्ड टोटल वॉटर प्युरीफिकेशन वर विश्वास ठेवतात.

फ्री होम डेमोसाठी 56006 ला "AG" SMS* करा किंवा फोन: 098210 48777, 3988 3333



Aquaguard Total

Total Health. Total Water Purification

*स्पेशल SMS रेट्स लागू